16 JAN 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आदी उपस्थित होते.

# विद्यार्थी, नागरिकांनी जाणून घेतले वजन-उंची गुणोत्तर

## विद्यापीठात शिबीर; खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची जयंती तथा महाराष्ट्र राज्य क्रीडा दिन आज शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यापीठात नागरिकांसाठी आयोजित केलेल्या वजन-उंची गुणोत्तर (बॉडी-मास इंडेक्स) तपासणीला उत्तम प्रतिसाद लाभला.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

तत्पूर्वी, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि जैव-रसायनशास्त्र अधिविभागातर्फे सकाळी साडेसात वाजल्यापासून विद्यापीठात मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या व्यक्तींसह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक यांच्यासाठी वजन-उंची गुणोत्तर तपासणी शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये १५० हून अधिक व्यक्तींची तपासणी करण्यात आली.

विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे आणि जैव-रसायनशास्त्र विभागाचे डॉ. कैलास सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुचय खोपडे, किरण पाटील, सुभाष पवार, डॉ. पी.एम. गुरव, डॉ. एस. एस. काळे यांच्यासह क्रीडा विभाग, जैव-रसायनशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी त्यासाठी परिश्रम घेतले. दरम्यान, आजच्या अभिवादन प्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, डॉ. बनसोडे, डॉ. सोनवणे, पी.बी. दांडगे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

# खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची जयंती तथा महाराष्ट्र राज्य क्रीडा दिन शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यापीठात नागरिकांसाठी घेतलेल्या वजन-उंची गुणोत्तर (बॉडी-मास इंडेक्स) तपासणीलाही उत्तम प्रतिसाद लाभला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि जैव-रसायनशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळपासून विद्यापीठात मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या व्यक्तींसह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक यांच्यासाठी वजन-उंची गुणोत्तर तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये १५० हून अधिक व्यक्तींची तपासणी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. पी. बी. दांडगे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात बीएमआय तपासणी शिबीर

कोल्हापूर : ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची जयंती तथा महाराष्ट्र राज्य क्रीडादिन शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यापीठात नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या वजन-उंची गुणोत्तर (बॉडी-मास इंडेक्स) तपासणीलाही नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये सोमवारी सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि जैव-रसायनशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ७.३० वाजल्यापासून विद्यापीठात मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या व्यक्तींसह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक यांच्यासाठी वजन-उंची गुणोत्तर तपासणी शिबिरात १५० हून अधिक व्यक्तींची तपासणी करण्यात आली. डॉ. शरद बनसोडे आणि डॉ. कैलास सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुजय खोपडे, किरण पाटील, सुभाष पवार, डॉ. पी. एम. गुरव, डॉ. एस. एस. काळे यांच्यासह क्रीडाविभाग आणि जैव-रसायनशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी यासाठी परिश्रम घेतले. अभिवादन प्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. बनसोडे, डॉ. सोनवणे, डॉ. पी. बी. दांडगे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी-विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठातील शिबिराला प्रतिसाद

## खाशाबा जाधव जयंतीनिमित्त आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोल्हापूरचे ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची जयंती आणि राज्य क्रीडा दिन शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विद्यापीठात नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या वजन-उंची गुणोत्तर (बॉडी-मास इंडेक्स) तपासणीलाही उत्तम प्रतिसाद लाभला.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि जैव-रसायनशास्त्र अधिविभाग यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या तपासणी शिबिरामध्ये १५० हून अधिक व्यक्तींची तपासणी करण्यात आली. विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे आणि जैव-रसायनशास्त्र विभागाचे डॉ. कैलास सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुचय खोपडे, किरण पाटील, सुभाष पवार, डॉ. पी. एम. गुरव, डॉ. एस. एस. काळे यांच्यासह क्रीडा विभाग आणि जैव-रसायनशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी या कामी परिश्रम घेतले.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2024
सकाळ




जरगनगर : येथील भालचंद्र चिकोडे ग्रंथालयातर्फे झालेल्या कार्यक्रमात बोलताना डॉ. विलास शिंदे. शेजारी राहुल चिकोडे.

# अन्न, वस्त्र, निवारासह हवा मूलभूत घटक

## डॉ. शिंदे : चिकोडे ग्रंथालयात पुस्तकांवर संवाद

**सकाळ वृत्तसेवा**

जरगनगर, ता. १५ : अन्न, वस्त्र, निवारा यासह मूलभूत घटक हवा असून त्यासाठी संघटित प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केले. येथील भालचंद्र चिकोडे ग्रंथालयात 'पुस्तकांवर बोलू काही' या कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, "आपल्या पर्यावरणात येणारी झाडे लावावीत. ती कमी पाण्यावर जगणारी, जास्तीचा ऑक्सिजन सोडणारी व कार्बनडाय ऑक्साईड जास्त शोषणारी असावीत. आपल्या परिसरात सतरा ते अठरा किलोमीटर परिसरात जे उगवते ते पीक आपण खावे."

बाभळीचे झाड जास्तीचे उत्पादन मिळवून देते जास्तीचा ऑक्सिजन देते. त्यामुळे इतर कोणत्याही झाडापेक्षा काटे बाभळ अत्यंत महत्त्वाचे आहे, त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या बाभळीच्या लेखाला अमाप प्रसिद्धी मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. बाभळीवर सुमारे अडीचशे पानांचे पुस्तक लिहित असल्याचेही ते म्हणाले. प्रास्ताविकात ग्रंथालयाचे अध्यक्ष राहूल चिकोडे यांनी नैराश्याची अनेक कारणे आहेत. हरवत चाललेला संवाद, दुसऱ्याचे न ऐकणे, एकत्र बसून मनमोकळ्या गप्पा नसणे ही महत्वाची कारणे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला 'अक्षर दालन'चे रवींद्र जोशी, राम देशपांडे, ॲड. मुकुंदराज मोरे, कमलाकर बुरांडे, चिंतामणी केळकर, रवींद्र अष्टेकर, अनिल चौगुले, अमोल बुद्धे, पापा चव्हाण, राम कांबळे आदी उपस्थित होते. योगेश चिकोडे, मधुरिमा चिकोडे, सचिन साळोखे, जयदीप मोरे, अतुल चव्हाण, कृष्णा आतवाडकर, विजय अग्रवाल, श्रीधर साळोखे आदींनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात संत तुकाराम अध्यासनातर्फे आज व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासन केंद्राच्या वतीने मंगळवार (दि. १६) रोजी सकाळी ११.३० वाजता मराठी अधिविभागामध्ये विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

जागतिक कीर्तीचे चित्रकार भास्कर हांडे पुणे हे 'संत तुकारामांची वास्तविक प्रतिमा' या विषयावर बोलणार आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे असतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2024
पुढारी

# पारंपरिक शिक्षणाला व्यावहारिक शिक्षणाची जोड हवी : प्रा. पोवार

कोल्हापूर : पारंपरिक शिक्षणातून मिळणारे ज्ञान व व्यावहारिक ज्ञान यातील वाढणारी दरी ही यशापासून दूर ठेवते. पारंपरिक शिक्षणाला व्यावहारिक शिक्षणाची जोड दिल्यास मूलभूत संकल्पनांच्या आधारे शिक्षण गतिशील करून व्यावहारिक क्षेत्रात सिद्ध होता येते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ भूगोल विभागातील प्रा. सुधीर पोवार यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात भूगोल दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अध्यक्षीय मनोगतात प्रा. यू. आर. हिरकुडे होते. प्रा. जे आर भरमगोंडा यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शिल्पा भोसले, नाझिया नदाफ, मेहेक मुलानी, निरजा पाटील यांनी मनोगते मांडली. प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. व्ही. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठात पत्रकारितेवर आज वक्तृत्व स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने मराठी पत्रकार दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी मंगळवारी (दि. १६) सकाळी १०.३० वाजता वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे.

स्पर्धेसाठी 'लोकशाही मूल्ये आणि पत्रकारिता', 'अर्थकारणाचा पत्रकारितेवरील प्रभाव' आणि 'पत्रकारितेची सद्य:स्थिती व भवितव्य' हे विषय आहेत. स्पर्धक विद्यार्थ्यांनी यापैकी एका विषयावर मते नोंदवायची आहेत. स्पर्धेत विद्यापीठ, महाविद्यालयातील पत्रकारिता विभागातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2024
पुण्यनगरी

# घाळीच्या खेळाडूंची स्पर्धेसाठी निवड

गडहिंग्लज : आय. टी. एम. विद्यापीठ, ग्वॉलीयर येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला हॉकी स्पर्धेसाठी येथील डॉ. घाळी कॉलेजच्या पाच खेळाडूंची निवड शिवाजी विद्यापीठ संघामध्ये झाली. त्यामध्ये स्वाती फुटाणे ही या संघाची गोलरक्षक म्हणून तर मोनिका आरबोळे, विद्या नगरे, अमृता जाधव, कृष्णा माने यांची निवड झाली आहे. यापुर्वी कॉलेजच्या संघाने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकवले आहे. खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांची प्रेरणा तर प्र. प्राचार्य डॉ. शिवानंद मस्ती, उपाध्यक्ष अरविंद कित्तूरकर, सचिव बी. जी. भोसकी, गजेंद्र बंदी, किशोर हंजी, महेश घाळी, विकास पाटील यांचे प्रोत्साहन तर रिकास अतिग्रे, मनोहर मांगले, अनिकेत मोटे यांचे मार्गदर्शन मिळाले.

16 JAN 2024
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाला सर्वसाधारण जेतेपद

## राज्य आंतर विद्यापीठ स्पर्धा; मुला-मुलींचे संघ ठरले भारी, रिलेमध्ये सुवर्णपदक

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. १५ : येथे झालेल्या रौप्य महोत्सवी राज्य आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने पुरुष व महिला गटात विजेतेपद पटकाविताना सर्वसाधारण विजेतेपदही मिळविले. स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची नेहा ढवाले आणि मुंबई विद्यापीठाचा निखिल ढाके यांनी सर्वोत्कृष्ट ॲथलिटचा पुरस्कार जिंकला.

महिलांमध्ये शिवाजी विद्यापीठाने ५३ गुणांसह बाजी मारली. नागपूरला ४५ गुणांसह दुसरे व पुणे विद्यापीठाला ४१ गुणांसह तिसरे स्थान मिळाले. पुरुषांत शिवाजी विद्यापीठाने ७१ गुणांसह बाजी मारली. पुण्याला ५५ गुणांसह दुसरे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूरने ३४ गुणांसह तिसरे स्थान मिळविले. यामुळे शिवाजी विद्यापीठाने १२४ गुणांसह सांघिक विजेतेपद पटकाविले. पुण्याला ९६ गुणांसह दुसरे व नागपूरला ७२ गुणांसह तिसरे स्थान मिळाले. सर्वोत्कृष्ट ॲथलिट् ठरविताना नेहा व निखिलची चारशे मीटर शर्यतीतील कामगिरी विचारात घेण्यात आली. त्यासाठी नेहाला महिलांमध्ये सर्वाधिक ९३८, तर निखिलला ९६१ गुण मिळाले. शिवाजी विद्यापीठाच्या संघाला प्रा. बाळासाहेब भोसले, सविता भोसले, डॉ. सुनील चव्हाण, राजेंद्र रायकर, एन. डी. पाटील, संजय पाटील, सचिन पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा व शारिरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी सर्वांचे कौतुक केले आहे.



नागपूर : येथे झालेल्या राज्य आंतर विद्यापीठ स्पर्धेतील ४-४०० मीटर रिले स्पर्धेतील विजेता शिवाजी विद्यापीठाचा संघ प्रशिक्षकांसोबत.

### विद्यापीठाचे यशस्वी खेळाडू

१) तीतिक्षा पाटोळे - ४०० व २०० मीटर धावणे - ब्रॉंझ
२) ऋषिकेश बागडे - ४०० मीटर धावणे - ब्रॉंझ
३) अजय खडे - १०० व २०० मीटर धावणे - ब्रॉंझ
४) ओमकार कुंभार - ८०० व १५०० मीटर धावणे - रौप्य
५) पूर्वा शेवाळे - १५०० मीटर धावणे - ब्रॉंझ
६) निकिता शेवाळे - थाळी फेक - रौप्य
७) प्रफुल्ल थोरात - गोळाफेक - सुवर्ण, थाळी फेक - रौप्य
८) संपदा ढमाळ - तिहेरी उडी - सुवर्ण, लांब उडी - ब्रॉंझ
९) धैर्यशील - उंच उडी - सुवर्ण
१०) अथर्व धज - उंच उडी - रौप्य
११) अंकुश हावके - ५००० मीटर धावणे - ब्रॉंझ
१२) ४x४०० मीटर रिले - मुली- रौप्य संघ - लीना कोहळे, स्वराली मोहिते, श्रेया जाधव, तीतिक्ष पाटोळे, आश्लेषा मांगले.
१३) ४x४०० मीटर रिले - पुरुष - सुवर्ण - विजेता संघ - अजय खाडे, सार्थक शेलार, सत्यजित पुजारी, ऋषिकेश बगाडे, अखिलेश खोत.
१४) ४x१०० मीटर रिले - मुली - सुवर्ण - विजेता संघ - लीना कोहळे, स्वराली मोहिते, रितिका मगदूम, तीतिक्षा पाटोळे, अनुष्का शिर्के.
१५) ४x४०० मीटर रिले - सुवर्ण - विजेता संघ असा - अजय खाडे, अखिलेश खोत, ऋषिकेश बगाडे, सार्थक शेलार, सत्यजित पुजारी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2024
पुढारी



गडहिंग्लज : पश्चिम आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेस निवड झालेल्या घाळी कॉलेजच्या खेळाडू.

# 'डॉ. घाळी'च्या पाच खेळाडूंची आंतरविद्यापीठ स्पर्धेस निवड

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

आयटीएम विद्यापीठ ग्वाल्हेर येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला हॉकी स्पर्धेसाठी येथील डॉ. घाळी कॉलेजच्या पाच खेळाडूंची निवड शिवाजी विद्यापीठ संघामध्ये झाली.

निवड झालेल्या खेळाडूंमध्ये स्वाती फुटाणे या गोलरक्षकासह मोनिका आरबोळे, विद्या नगरे, अमृता जाधव, कृष्णा माने या खेळाडूंचा समावेश आहे. यापूर्वी कॉलेजच्या संघाने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेत विजेतपद पटकविले आहे. सर्व खेळाडूंना संस्थाध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांची प्रेरणा तर प्राचार्य डॉ. शिवानंद मस्ती, उपाध्यक्ष अरविंद कित्तूरकर, सचिव बी. जी. भोसकी, सहसचिव सीए गजेंद्र बंदी, संचालक किशोर हंजी, महेश घाळी, ॲड. विकास पाटील यांचे प्रोत्साहन मिळाले. प्रा. विकास अतिग्रे, मनोहर मांगले, अनिकेत मोटे यांचे मार्गदर्शन मिळाले.